# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोननं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १८१-२०२२** **दनांक :- १६/०६/२०२२**

## एटीएम कार्डची अदलाबदल करुन फसवणूक करणाऱ्या आरोपीतास नवघर पोलीसांनी ठोकल्या बेडया.

दिनांक-०७/०६/२०२२ रोजी तक्रारदार हे त्यांच्या राहत्या घरुन बंदरवाडी नाका, भाईंदर रेल्वे स्टेशनजवळ, ओस्वाल शॉपिंग सेंटर, नवघर रोड येथील एसबीआय बँकेच्या एटीएम मध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. सदर एटीएम मशीनमधून तक्रारदार हे पैसे काढत असतांना एक अनोळखी इसम हा त्यांचे पाठीमागुन सदर ठिकाणी आला व तो तक्रारदार हे वयोवृध्द असल्याने त्यांना मी एटीएम मशीनमधून पैसे काढुन देणेसाठी मदत करु का असे बोलुन त्यांना एटीएम मधुन पैसे काढुन देण्याचा बहाना केला व तक्रारदार यांचे एसबीआय बँकेचे एटीएम कार्ड हातचलाखीने स्वतःकडे घेतले व त्याचे स्वतःकडील बंद एसबीआय बँकेचे एटीएम कार्ड तक्रारदार यांना दिले व ते कार्ड पुन्हा एटीएम मशीनमध्ये टाकुन तक्रारदार यांना त्यांच्या एटीएम चा पिनकोड विचारला. त्यावेळी तक्रारदार यांनी सदर इसमास त्यांचे एटीएमचा पिनकोड सांगितला. त्याप्रमाणे सदर इसम याने एटीएम पिन टाकला मात्र नमुद अनोळखी इसमाने एटीएम कार्ड बदली केले असल्याने मशीनमधुन पैसे निघाले नाही. त्यानंतर सदर अनोळखी इसम हा फिर्यादी यांचे एटीएम कार्ड घेवुन तेथुन निघुन गेला. त्यानंतर नमुद अनोळखी इसम याने तक्रारदार यांच्या एटीएम कार्डचा वापर करुन त्यांच्या एसबीआय बँकेच्या बँक खात्यातुन एकुण-२,०६,१८५/-रुपये (अक्षरी- दोन लाख सहा हजार एकशे पंच्यांशी रुपये) वेगवेगळया एटीएम मधुन काढले व सदर कार्डचा वापर करुन वस्तु खरेदी केल्या आहेत. सदरची बाब फिर्यादी यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी नवघर पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्याने गुरनं. I ४४०/२०२२ भादंविसं. कलम-४२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीताचा शोध घेणेकामी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली तपास सुर करण्यात आला. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान नवघर पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने घटनास्थळावरील तांत्रीक पुरावे व करण्यात आली. सदर आरोपी याच्याकडे पोलीस कस्टडी दरम्यान विचारपुस करुन त्याचेकडून गुन्हयांतील फसवणुक झालेल्या रकमेपैकी १,५५,४६०/- रुपये किंमतीची मालमत्ता ( रोख रक्कम रुपये-४८५००/-, एलईडी टीव्ही, सिलींग फॅन, कपडे, पाठीवरील सॅग, बुट व आरोपी वापरत असलेला मोबाईल फोन ) हस्तगत करण्यात आली आहे. तसेच सदर आरोपीकडून वेगवेगळया बँकाचे एकुण-३७ एटीएम कार्ड हस्तगत करण्यात आलेली आहेत. नमुद गुन्हयाचा तपास करीत असताना आरोपी याचा खालील नमुद गुन्हयात देखील सहभाग असल्याचे निष्पन्न झालेले आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नंबर व कलम |
|---|---|---|
| १ | नवघर पोलीस ठाणे | I २६६/२०२२ भादंविसं.कलम-४२० |
| २ | नवघर पोलीस ठाणे | I ३०५/२०२२ भादंविसं.कलम-४२० |

तसेच अटक आरोपी याचेकडे मिळून आलेली वेगवेगळया बँकेची एकुण-३७ एटीएम कार्डबाबत संबधीत बँकाकडून माहिती मिळवून त्याबाबत तपास चालु आहे. तसेच सदर आरोपी याने आणखी काही गुन्हे केलेले आहेत अगर कसे याबाबत अधिक तपास चालु आहे.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय) अती. कार्य. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. श्री शशीकांत भोसले, सहा. पो. आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, श्री. सुशीलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि योगेश काळे, पोउपनि/अभिजित लांडे, पोह/भुषण पाटील, पोना/गणेश जावळे, पोशि/नवनाथ घुगे, पोशि/सुरज घुनावत, पोशि/विनोद जाधव, पोशि/ओमकार यादव यांनी केलेली आहे.